शिल्पकार विकासाचा...
# देशदूत
इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २८ । अंक १५४ । शुक्रवार, दि. ३० मे २०२५ । पाने - ८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## पाकिस्तान सीमेवर गोळीबार

**कराची ।** पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातील दीर्घ काळ सुरू असलेल्या संघर्ष पुन्हा एकदा उफाळून आला आहे. अफगाणिस्तानचे सैन्य पाकिस्तानी सीमेत घुसले असून दोन्ही बाजूने गोळीबार सुरू आहे. हा संघर्ष इतका चिघळला आहे की दोन्ही देशाच्या सीमेवर युद्धजन्य परिस्थिती बनली आहे. चाघी हा तोच भाग आहे जो बलूचिस्तानात डूरंड लाईनजवळ स्थित आहे. डूरंड लाईन ज्याला अफगाणिस्तानातील तालिबानी सरकारने अवैध घोषित केले होते.

हॉस्पिटल क्षेत्रात करीअर करणाऱ्यांसाठी सुर्वणसंधी, सरकारी,निमसरकारी,खासगी नौकरी साठी उपयुक्त
रु.२२000 ते ४४000 पर्यंत पगार
मिळवुन देणारे एका वर्षाचा कोर्सला प्रवेश सुरु
• डिप्लोमा इन सॅनिटरी हेल्थ इन्स्पेक्टर
• मल्टी पर्पज हेल्थ वर्कर (M.P.W.)
आजच प्रवेश घेण्यासाठी संपर्क प्रो. भारती काळे,9112047936
हेल्थ प्लस इन्स्टिट्युट अ‍ॅण्ड प्लेसमेन्ट
एफ-७,गोलाणी मार्केट,दुसरामजला,जळगांव,मो.9623722802

### विनम्र अभिवादन!



गुरु अर्जुनदेव शहीद दिन.

# झाले वाकडे तर लढू वेगळे! बावनकुळेंचा शिंदेंसह अजितदादांना संदेश



**मुंबई ।** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. महायुती आणि महाविकास आघाडीच्या घटक पक्षांकडून निवडणुकीची तयारी सुरू झाली आहे, मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती म्हणून लढवल्या जाणार की? स्वबळावर लढणार याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. यावर आता मंत्री आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. महायुतीमध्येचं निवडणुका होतील पण ज्याठिकाणी जुळणार नाही त्याठिकाणी मैत्रिपूर्ण लढत होईल, त्यानंतर पुन्हा एकत्रित येऊ असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.याचा अर्थ महायुतीमध्ये प्रॉब्लेम आहे, असा होत नाही, असेही त्यांनी यावेळी म्हटले.

निवडणूक घेण्याचे अधिकार हे आयोगाला आहेत, आयोग जेव्हा निवडणूक घेईल तेव्हा सरकार म्हणून यंत्रणा तयार आहे. भाजप म्हणून देखील आम्ही सक्षमपणे तयार आहोत. निवडणुकांमधून आम्ही काही गोष्टी शिकतो, लोकसभा निवडणुकीतून काही गोष्टी आम्ही शिकलो, त्यानंतर चारच महिन्यांमध्ये विधानसभा निवडणूक आम्ही जिंकली, जिंकणे हरणे या लढाईत न जाता आम्ही जनतेचे काम करत आहोत, असे बावनकुळे यांनी यावेळी म्हटले.

### माझा जरी फोन आला तरी वाळू माफियांना सोडू नका!

यावेळी बोलताना त्यांनी वाळू धोरणावर देखील प्रतिक्रिया दिली आहे. वाळूमाफियांना रोखण्यासाठी नवीन वाळू धोरण आम्ही आणलं आहे. अनेक जनांचे मंत्र्यांशी वगैरे संबंध असतात, वाळू संदर्भात तर काही जण अधिकाऱ्यांना थेट माझे देखील नाव सांगतात. पण माझा फोन जरी आला तरी चुकीच्या कामाला नाही म्हणा, अशा सूचना मी अधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत. पुढच्या ३ वर्षांत वाळू माफिया आणि वाळू संदर्भातले सर्व महत्वाचे प्रश्न संपलेले असतील, असे यावेळी बावनकुळे यांनी म्हटले आहे.

## संपादकीय

### बदल अपरिहार्य

एआय तथा कृत्रिम बुद्धिमत्तेविषयीचे आश्चर्य अजूनही ओसरलेले नाही. तथापि तिच्यामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांचा वेध घेऊन त्यावर उपाययोजनांचा शोध घेण्याची प्रक्रिया मात्र हळूहळू वेग घेत आहे. शिक्षण, व्यवसाय किंवा उदरनिर्वाहाच्या विविध क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यास शिकणे मानवासाठी अपरिहार्य आहे. त्यासाठी माणसाला त्याच्या कार्यपद्धतीत बदल करावे लागतील असा सूर एका परिषदेत वक्त्यांनी व्यक्त केला. त्यातील मतितार्थ प्रामुख्याने संशोधक आणि तज्ज्ञांनी लक्षात घेण्याची गरज आहे. तंत्रज्ञानाच्या बाबतीत समाजात मोठ्या प्रमाणात निरक्षरता आढळते. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे काय? हे सामान्य माणसांच्या लक्षात येईलच असे नाही. किंवा आले तरी कदाचित त्याला उशीर झालेला असू शकेल. तेव्हा कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अन्य डिजिटल साधनांच्या वापराची हातोटी शिकणे, तिचा दैनंदिन कामात वापर करणे आणि त्यासाठीचे प्रयोग युवांनी करावेत यासाठी अभ्यासक आणि तज्ज्ञांना पुढाकार घ्यावा लागेल. उदाहरणार्थ, काही डिजिटल साधनांचा वापर भाषा शिकण्याचे साधन म्हणून केला जाऊ शकेल. अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा अन्य डिजिटल साधन तंत्रज्ञानाच्या फारशा खोलात न जाता त्याचा वापर करुन घेणारे बदल हळूहळू दृष्टीपथात येतात. सातारा, सर्कलवाडी येथील एका शेतकऱ्याने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने डाळिंब शेती करण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. शेतीची अनेक कामे सोपी होऊ शकतील, अशी अपेक्षा त्यांनी माध्यमांकडे व्यक्त केली. चेरीची झाडे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून हिरवीगार ठेवण्याचे प्रयत्न जपानमध्ये सुरु आहेत. शेतीक्षेत्रातील पान २ वर

# महाराष्ट्र नंबर 1

## वर्षभरात देशातील परकीय गुंतवणुकीत ४० टक्के हिस्सा



**मुंबई ।** महाराष्ट्रातील उद्योगधंदे इतर राज्यात जात असल्यावरून राज्यातील महायुती सरकारवर सातत्याने टीका होत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे की देशाने वर्षभरात आकर्षित केलेल्या एकूण गुंतवणुकीपैकी ४० टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात झाली आहे. तसेच, गेल्या वर्षी महाराष्ट्राने आकर्षित केलेल्या एकूण गुंतवणुकीपेक्षा यंदा राज्यात ३२ टक्क्यांनी अधिक गुंतवणूक झाली आहे. महाराष्ट्र थेट परकीय गुंतवणुकीच्या बाबतीत पुन्हा एकदा देशात पुन्हा अव्वल ठरल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मला हे सांगताना अतिशय आनंद होत आहे की २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीतील परकीय गुंतवणुकीबाबतची आकडेवारी सुद्धा आता जाहीर झाली आहे. त्यानुसार या संपूर्ण वर्षांत मिळून महाराष्ट्राने १,६४,८७५ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक आकर्षित केली आहे. जी यावर्षी देशात आलेल्या एकूण गुंतवणुकीच्या ४० टक्के इतकी आहे. यावर्षी देशात आलेली गुंतवणूक ही ४,२१,९२९ कोटी रुपये इतकी आहे.

### राज्याची विक्रमी कामगिरी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात गेल्या वर्षात झालेल्या गुंतवणुकीशी तुलना केली तर यावर्षी त्यापेक्षा ३२ टक्के अधिक गुंतवणूक आली आहे. या शेवटच्या तिमाहीत २५,४४१ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत हे वर्ष गेल्या १० वर्षांतील रेकॉर्ड स्थापित करणारे वर्ष ठरले. अर्थात हा रेकॉर्ड आपण पहिल्या ९ महिन्यातच मोडला होता. या विक्रमी कामगिरीसाठी मी महाराष्ट्रातील जनतेचे अतिशय मनापासून अभिनंदन करतो. माझे सहकारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि मंत्रिमंडळाच्या नेतृत्त्वाखाली आपल्या महाराष्ट्राची ही घौडदौड ही अशीच सुरु राहिल असे ते म्हणाले.

## पोलीस महासंचालक सुपेकरांना दणका



**पुणे ।** वैष्णवी हगवणे प्रकरणात जालिंदर सुपेकर यांचे थेट नाव आल्याने अजित पवारांनी त्यांना फोन करत ताकीद दिली आणि या प्रकरणात तुमचा सहभाग आढळला तर कारवाई करणार असाच थेट इशारा दिला होता. आता जालिंदर सुपेकर यांच्या अडचणीत मोठी वाढ झाल्याचेही बघायला मिळतेय. जालिंदर सुपेकर यांच्याकडून तीन कारागृहांचा कारभार हा काढून घेण्यात आलाय. तीन कारागृहांचा उपमहानिरीक्षक पदाचा अतिरिक्त कारभार काढण्यात आलाय. जालिंदर सुपेकर यांची नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर कारागृहांची अतिरिक्त जबाबदारी काढून घेण्यात आली. वैष्णवी हगवणे प्रकरणात जालिंदर सुपेकर यांच्यावर आरोप करण्यात आले आहेत, त्यांच्याकडून या प्रकरणाबद्दल स्पष्टीकरण देखील देण्यात आले. मात्र, यादरम्यानच त्यांच्याकडून अतिरिक्त कारभार काढण्यात आलाय. वैष्णवी हगवणे प्रकरणात आरोप झाल्यामुळेच सुपेकरांना हा दणका देण्यात आल्याची एक जोरदार चर्चा ही रंगताना दिसतंय. येरवडा जेलचे महानिरीक्षक जालिंदर सुपेकर हे असून त्यांच्यावर ही अतिरिक्त जबाबदारी होती आणि त्यांच्यावर काढून घेण्यात आली. वैष्णवी हगवणे हिचे वडील आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यामध्ये एक बैठक झाली. यादरम्यान अजित पवारांनी थेट फोन सुपेकरांना केला होता. वैष्णवी हगवणे प्रकरणात दररोज धक्कादायक खुलासे होताना दिसत आहेत.

## मला गुरुदक्षिणेत पाकव्याप्त काश्मीर हवा!

### रामभद्राचार्यांची लष्करप्रमुखांकडे मागणी



**चित्रकूट ।** भारतीय लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी चित्रकूट येथील जगद्गुरु रामभद्राचार्य यांची त्यांच्या आश्रमात भेट घेतली. लष्करप्रमुखांनी आश्रमाला भेट दिली आणि नेत्र रुग्णालयातील सिम्युलेटर मशीनचे उद्घाटन केले. लष्करप्रमुखांच्या भेटीदरम्यान जगद्गुरु रामभद्राचार्य यांनी त्यांना दीक्षा दिली. दीक्षेच्या बदल्यात लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्याकडून त्यांनी पाकव्याप्त काश्मीर म्हणजेच पीओके मागितला आहे.

लष्करप्रमुखांनी राम मंत्राने दीक्षा घेतली. लष्करप्रमुखांच्या भेटीची माहिती देताना रामभद्राचार्य यांनी सांगितले की, मी त्यांना राम मंत्राने तीच दीक्षा दिली जी भगवान हनुमानाने माता सीतेकडून मिळवली होती आणि नंतर लंका जिंकली होती. मी त्यांच्याकडून दक्षिणा मागितली आहे, की मला पीओके परत हवे आहे.

### पीओकेमधील लोक आपलेच-राजनाथ

**श्रीनगर ।** पीओकेमधील लोक आपले आहेत, त्यांना फक्त दिशाभूल केले जात आहे. पीओके आपलाच एक भाग आहे आणि मला विश्वास आहे की, एक दिवस पीओके स्वतःच भारतात सामील होण्यास तयार होईल,असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. राजनाथ सिंह म्हणाले, वेगळे झाले असले तरी ते आमचे भाऊ आहेत. ते कुठेही गेले तरी आमच्याकडे परत येतील.



**बारामती ।** राज्यभरात पावसाने कहर केल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. पुणे जिल्ह्यातदेखील याची झळ बसली. याची दखल घेत उपमुख्यमंत्री अजित पवार तत्काळ नुकसानग्रस्त परिसरात पोहोचले व प्रशासन व कार्यकर्त्यांच्या मदतीने व्यवस्था पूर्वपदावर आणण्यासाठी प्रयत्न सुरु केले.

## आशासेविका मानधनापासून वंचित

**मुंबई ।** आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या आशासेविका आणि गटप्रवर्तक गेल्या सात महिन्यापासून मानधनापासून वंचित आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी गुरुवारी एक्स या समाजमाध्यमातून आशासेविका आणि गटप्रवर्तकांच्या प्रलंबित मानधनाचा मुद्दा उपस्थित केला. समाजाच्या आरोग्याची जबाबदारी आपल्या खांद्यावर पेलणाऱ्या आशासेविका आणि गटप्रवर्तकांना गेल्या सात महिन्यांपासून मानधनच मिळालेले नाही. आशासेविका, गटप्रवर्तक या आरोग्यसेवेच्या प्रमुख प्रवाहातील घटक आहेत. या सर्वांचे चरितार्थ त्यांना मिळणाऱ्या मानधनातून चालते. त्यांच्या घरी चूल पेटणार कशी? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणे शक्य नाही-तटकरे



**मुंबई ।** राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाबाबतचा कुठलाही प्रस्ताव सध्या पक्षाकडे आलेला नाही आणि आमच्या विचारार्थही नाही. आम्ही राष्ट्रीय लोकशाही आघाडीत आहोत. आम्ही आघाडीतच राहणार असून या भूमिकेशी ज्यांना समरस व्हायचे असेल किंवा या भूमिकेबरोबर वाटचाल करायची असेल त्यांचे जरुर पक्षात स्वागत आहे, असा खुलासा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत केला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मध्यंतरी दिलेल्या मुलाखतीत राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत भाष्य केले होते. याशिवाय शरद पवार गटातील काही आमदारांची मागणी अजित पवार यांच्यासोबत जाण्याची आहे, त्यामुळे शरद पवार गटाचे अजित पवार गटात विलीनीकरण होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. या पार्श्वभूमीवर आज पत्रकारांशी बोलताना तटकरे यांनी विलीनीकरणाची चर्चा पान २ वर

### राज्यात आपत्ती पथके सतर्क

**मुंबई ।** राज्यात आपत्तीपरिस्थितीत मदत आणि बचाव कार्यासाठी एनडीआरएफ, एसडीआरएफ पथके सतर्क आहेत. मुंबई शहर, उपनगरमध्ये एनडीआरएफची ३, पालघरमध्ये १ तर नागपूर येथे २ पथके तैनात आहेत. पुणे मुख्यालय येथे एनडीआरएफची २ पथके राखीव ठेवण्यात आली आहेत.




### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 2525 |
| नवती (२) | : 2325 |

### मिश्कीली




# धरणगावात सुरु झाली 'बर्तन बँक'

### स्वच्छतेचा संदेश : नगरपालिकेचा स्तुत्य उपक्रम; राज्यभरातील पहिला प्रयोग

**धरणगाव । प्रा.बी.एन.चौधरी ।** शहरात लग्न, वाढदिवस यासह विविध समारंभामध्ये वापरण्यात येणाऱ्या प्लास्टिकच्या वस्तूंमुळे कचऱ्याची समस्या निर्माण होतात. त्यावर उपाय म्हणून धरणगाव नगरपरिषदेने बर्तन बँकेची स्थापना केली आहे. यामध्ये विविध समारंभासाठी भोजनाकरिता लागणारे ताट, ग्लास इत्यादी वस्तू माफक दरात उपलब्ध करुन दिल्या जातात. यामुळे नागरिक प्लास्टिक वस्तूंचा वापर टाळतील आणि कचऱ्याच्या समस्येला आळा बसेल अशी संकल्पना आहे. या योजनेचा लाभ २९ मे रोजी मोठा माळी वाडा परिसरातील रहिवासी संजय महाजन यांनी घेतला. त्यांचा पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील व मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांच्या हस्ते शाल, रोपटे देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विजय महाजन, व्ही.टी.माळी उपस्थित होते. लग्नकार्यामध्ये बरतन बँकेतील ताटांचा वापर करून पर्यावरण संवर्धन व स्वच्छतेचा संदेश देणाचा धरणगाव नपाचा हा अभिनव उपक्रम असून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यामुळे श्री संजय महाजन यांचे समाजात तसेच गावात कौतुक होत आहे. धरणगाव शहरातील सर्व नागरिकांनी आपल्या घरातील कौटुंबिक कार्यक्रम प्रसंगी, लग्न, वाढदिवस यासारख्या कार्यक्रमासाठी पान २ वर



**धरणगाव ।** नगरपालिकेने सुरु केलेल्या 'बर्तन बँके'चा पहिला उपयोग करणाऱ्या संजय महाजन यांचा सत्कार करतांना पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील व मुख्याधिकारी रामनिवास झंवर व विजय महाजन, व्ही.टी.माळी उपस्थित होते.

